लघुटंकलेखक/निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी) या पदांवरील नियुक्तीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रशिक्षणानंतर घेण्यात येणारी राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेची परीक्षा शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेशी समकक्ष ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक आरजीडी-1393/885/तेरा,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 4 नोव्हेंबर 1993.

पहा :- शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक टीएसए-1074/91053/टी, दिनांक 23 ऑगस्ट 1974.

**शासन निर्णय** :- राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेमार्फत मराठी लघुलेखनासाठी 100 शब्द प्रति मिनिट आणि टंकलेखनासाठी 30 शब्द प्रति मिनिट या गतीच्या परीक्षा घेण्यात येतात. शासकीय/निम-शासकीय सेवेतील लघुटंकलेखक, तसेच लघुलेखक (निम्नश्रेणी) पदांवरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमांत व्यावसायिक अर्हतेसाठी निश्चित करण्यात आलेल्या गतीशी सदर गती समतुल्य असल्याने सदर परीक्षांसाठी देण्यात येणारे प्रमाणपत्र या पदांच्या सेवा भरतीसाठी शासकीय वाणिज्य प्रमाणपत्रांशी समकक्ष ठरविण्यात येत आहे.

2. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी या आदेशांची नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग/का. 12, 14-अ,
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शालेय शिक्षण विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील इतर सर्व कार्यासने,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
निवड नस्ती (2 प्रती).

---

*पत्राने.

शामभु-रोटा-साप्रवि-एच-986(3700-11-93)